**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत महाविद्यालयांना सूचना**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे कायद्याच्यादृष्टीने अनिवार्य आहे. याबाबत यापूवी सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. संबंधित कक्षाच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या तक्रारी महाविद्यालयाकडे करु शकतात. याशिवाय विद्यापीठाकडील तक्रारी असल्यास आणि महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाकडून निर्णय न झालेल्या वा न्याय न मिळालेल्या तक्रारींच्या बाबतीत त्या तक्रारी विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाकडे निर्देशित करण्यात येतात.

सर्व संलग्नित महाविद्यालयात विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने यापूर्वी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना वारंवार पत्र पाठवून कळविलेले आहे. परंतू अद्यापही काही महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन न झाल्याचे दिसून आले आहे. विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन झाल्यानंतर कक्षामध्ये समावेश करण्यात आलेल्या सदस्यांची माहिती ही ऑनलाईन भरावयाची आहे. सॉफ्टवेअर हाताळण्याच्या संदर्भातील सविस्तर माहिती विद्यार्थी विकास विभागाने नुकतेच पत्राद्वारे संलग्नित महाविद्यालयाला सविस्तर कळविलेले आहे. तरी ज्या महाविद्यालयात अद्यापही विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही, त्या महाविद्यालयांनी सदर कक्ष तातडीने स्थापन करुन विद्यार्थी विकास विभागाच्या ऑनलाईन पोर्टलवर विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची माहिती पाठवावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. दिनेशकुमार सातंगे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवरून संपर्क साधता येईल.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २३/११/२०२०.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी